## विभाग II - देवाच्या गोष्टी

## देवाच्या आपल्यासाठी असलेल्या प्रेमाच्या उत्साहवर्धक (गोष्टी) साक्षी

**इल्मेडाची गोष्ट - बालकासारख्या प्रार्थना**

इल्मेडाला नोकरी नव्हती आणि तिला नोकरी मिळणे अत्यंत आवश्यक होते. तिला आपल्या कुटुंबाची काळजी घ्यायची होती म्हणून नोकरी मिळणे, कुटुंबाची काळजी घेण्यासाठी पैसे कमविणे अत्यंत गरजेचे होते. एका रात्री ती घराबाहेर पडली, तिने ताऱ्यांनी भरलेल्या/ प्रकाशलेल्या आकाशाकडे पहिले आणि प्रार्थना केली, "पित्या, मला नोकरीची गरज आहे, मला मदत कर." तिने अद्याप कोणत्याही कंपनी मध्ये कामासाठी अर्ज केला नव्हता. दुसऱ्या दिवशी तिला दोन कामांचा प्रस्ताव आला. तिच्या अनेक मैत्रिणीपैकी एकी कडून आला होता. तिने परमेश्वराची स्तुती केली आणि आभार मानले. आपला प्रेमळ स्वर्गीय पिता ज्याने तिची प्रार्थना ऐकली होती व प्रार्थनेचे उत्तर दिले.
खरं म्हणजे आपला स्वर्गीय प्रेमळ पिता आपले अंतःकरण व मन जाणतो. आपण केंव्हाही त्याच्या कडे लहान बालकासारखे जाऊ शकतो. तो आपल्या बालकासारख्या प्रार्थना ऐकतो.

<u>**मत्तय** १८:२-४</u>

*नंतर येशूने एका छोट्या बालकाला आपल्याजवळ बोलावून त्याला त्याच्या मध्ये उभे केले आणि म्हटले, "मी तुम्हाला खचित सांगतो, तुमचे मन वळल्याशिवाय व तुम्ही बालकासारखे झाल्याशिवाय तुमचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होणारच नाही. यास्तव जो कोणी आपल्याला या बालकासारखी लीन करेल तोच स्वर्गाच्या राज्यात मोठा होईल.*

## प्रीतीची गोष्ट- मागा म्हणजे तुम्हास मिळेल

मी माझ्या दूरच्या बहिणीबरोबर गर्दी असलेल्या बसमध्ये चढले. तेथे बसण्यासाठी जागा नव्हती. माझ्या पायाच्या स्नायूत गोळा आला. मला खूप वेदना होत होत्या आणि मला खाली बसावे असे खूप वाटत होते. पण तेथे रिकाम्या जागा नव्हत्या. मी येशूकडे मला मदत करण्यासाठी प्रार्थना केली. मी माझी प्रार्थना संपवण्या आधीच एका मुलीला उठून दरवाजाकडे जाताना पाहिलं. मी त्या जागेवर जाऊन बसले व देवाचे आभार मानले.

**मत्तय ७:७-११**

*मागा म्हणजे तुम्हास दिले जाईल. शोधा म्हणजे तुम्हास सापडेल. ठोका म्हणजे तुम्हास उघडले जाईल. कारण जो कोणी मागतो त्याला मिळते, जो शोधतो त्याला सापडते व जो कोणी ठोकतो त्याला उघडले जाते. आपल्या पुत्राने भाकर मागितली तर त्याला धोंडा देईल, मासा मागितला तर साप देईल असा तुम्हामध्ये कोणी मनुष्य आहे? यास्तव तुम्ही वाईट असता, आपल्या मुलास चांगल्या देणग्या देण्याचे समजता तर तुमच्या स्वर्गातील पित्याजवळ मागतात त्यास तो किती विशेषकरून चांगल्या देणग्या देईल?*

## पूर्णिमाची गोष्ट- देवाला कोणतीच गोष्ट अशक्य नाही

माझ्या आरोग्याच्या अनेक समस्या होत्या. अनेक आजारांसाठी मला औषधे घ्यावी लागत होती. माझ्या आजारपणामुळे मी तणावाखाली होते. मी माझे जीवन ख्रिस्ताला अर्पण केले. नियमितपणे मी मनापासून त्याची प्रार्थना करू लागले.

येशूने मला माझ्या सर्व अडचणींपासून वाचवले व मी माझी औषधे घेण्याचे बंद केले. आता मी फक्त एकाच औषध घेते, रक्तदाबासाठी. फक्त तेवढेच. मी आभार मानते आणि त्या देवाची स्तुती करते. जे चमत्कार त्याने माझ्या आयुष्यात केलेत त्यासाठी.

आधी संध्याकाळी मला खूप उतावळ्या सारखे व उत्सुक असल्यासारखे वाटायचे. संध्याकाळी व रात्री एकटे राहायची कल्पना करू शकत नव्हते. मला काळोखाची भीती वाटायची. देवाने मला त्याच्या शक्तीने आशीर्वादित केले आहे. आता मी रात्री उशिरापर्यंत एकटी राहू शकते. विजेचा प्रवाह खंडित झाला तरीही मेणबत्तीच्या प्रकाशात मी समाधानी असते.

आयुष्याच्या प्रत्येक पावलागणिक देवाने मला आशीर्वादित केले आहे. त्याने मला माझ्या सार्वजनिक आयुष्यात प्रसिद्धी आणि यश यांनी आशीर्वादित केले आहे. सर्व गौरव व सन्मान त्याचा आहे.

रोज सकाळी मी, माझ्या दिवसाची सुरुवात देवाची प्रार्थना करून, पूर्णपणे त्याला शरण जाते. रात्री बिछान्यावर पडण्याआधी मी देवाचे त्याच्या आशीर्वादासाठी आभार मानते. दिवस जेव्हा जेव्हा मला मोकळा वेळ मिळतो, मी त्याला आठवते, त्याची स्तुती करते आणि आशीर्वादासाठी त्याचे आभार मानते- सोबत त्याची खरी कृपा जी माझ्यावर व माझ्या जवळच्या लोकांवर आहे त्याबद्दल.

**यिर्मया ३२:२७**

*"पहा, मी परमेश्वर सर्व मानवजातीचा देव आहे. मला अवघड असे काही आहे काय?"*

**<u>फिलीपैकरांस पत्र ४:१३</u>**

*"मला सामर्थ्य देणारयाच्या ठायी मी सर्व काही करावयास शक्तिमान आहे."*

**अल्फोन्साची गोष्ट -**

**अधिपती हा आपला पुरवणारा आहे. आपल्याला दुसरी कोणतीच गोष्ट जास्त नको.**

मला फ्रान्समध्ये एक वर्ष काम करण्यासाठी दिले होते. मी प्रार्थना केली आणि त्या कामासाठी होकार दिला. माझ्या सहकाऱ्यांनी मला ताकीद दिली होती कि फ्रान्समध्ये राहणे खूप कठीण असते. कारण तिथल्या लोकांना इंग्रजी अजिबात समजत नाही. जर एखादी व्यक्ती फ्रेंच बोलू शकत नसली तर एका मोठ्या आव्हानाला त्या व्यक्तीला सामोरे जावे लागते. त्यांनी मला असेही सांगितले कि कामाच्या ठिकाणी असलेला ग्राहक वर्ग जास्त मैत्रीपूर्ण नसतो. त्यांनी सांगितले कि ती संस्कृती खूप वेगळी आहे. फ्रान्सच्या त्या शहरात जास्त भारतीय राहत नाहीत, म्हणून त्या ठिकाणी जीवन खूप खिन्न, उदासीन आणि कठीण होईल.

या सर्व टीका मी देवाला प्रार्थनेत अर्पण केल्या. देवाने माझ्या अंतःकरणात एक इच्छा घातली कि मी ज्या ठिकाणी जाणार होते त्या जागेसाठी जी माणसे मला भेटतील त्यांच्या साठी मी प्रार्थना करावी. माझ्या कामासाठीचा पत्रव्यवहार पूर्ण होत असताना मी पुढील काही महिने त्या जागेसाठी नियमित प्रार्थना करू लागले. भविष्यकाळातील माझ्या सहकाऱ्यांसाठी आणि जागेसाठी मी प्रार्थना करू लागले.

आपला देव त्याने दिलेल्या आश्वासनांसाठी एकनिष्ठ आहे. माझ्या छोट्या छोट्या गरजांची तो काळजी घेतो. मार्शेलच्या (फ्रान्समधील शहर) विमान प्रवासात मला एक स्त्री भेटली. ती इंग्रजी अत्स्खलित बोलत होती. तिने मला काही सूचना व सल्ला दिला. त्यांची मला खूप मदत झाली.

मी विमानतळावरून बाहेर आले आणि टॅक्सीत बसले. आल्हाददायक घटनेमुळे मला आश्चर्य वाटले. कारण तक्षि चालक शुद्ध इंग्रजी बोलू शकत होता. माझ्या वसती गृहाकडे पोचणे मला सहज शक्य झाले. अनेक वेळा, अनेक प्रसंगात देवाने मला मार्गदर्शन केले, फ्रांस मधील माझ्या वास्तव्यात मला चांगले मित्र मैत्रिणी देऊन मला आशीर्वादित केले. मला कोणत्याही आव्हानाला तोंड द्यावे लागले नाही किंवा माझ्या कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांबरोबर काम करणे मला अशक्य झाले नाही. दर रविवारी भक्ती उपासना होणारे देऊळ मी शोधले. मी छोटीशी जागा जी मला राहण्यास योग्य होती ती शोधली.

फान्स्मधील माझे वास्तव्य आव्हानात्मक कामापेक्षा परमेश्वराच्या मोहकतेमुळे एवढे आशीर्वादित झाले कि मी ते शब्दात व्यक्त करू शकत नाही. फ्रान्समधील आश्चर्यकारक दिवस मला आठवतात आणि त्या ठिकाणाला पुन्हा एकदा भेट देण्याची मी इच्छा करते. मी त्या ठिकाणी छान मित्र मंडळी जमवलीत. मला जादा बक्षीस म्हणून दिलेली गोष्ट म्हणजे परमेश्वराने माझा त्याचे प्रेम इतरांबरोबर वाटण्यासाठी त्याचे साधन म्हणून केला आहे. मी त्याची स्तुती करते.

**<u>फिलीपेकरांस पत्र ४:१९-२०</u>**

*माझा देव आपल्या सम्पत्यनुरुप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशुमध्ये गौरवाने पुरवील. आपला देवपिता याचा युगानुयुग गौरव असो. आमेन*

**हेरावतीची गोष्ट**

**आपल्याला निरोगी करणारा देव**

मी माझ्या यजमानांबरोबर रोज सकाळी चालण्यासाठी जाते. एका रविवारी जेव्हा मी चालत होते, मला खूप अशक्त वाटले. मी चालू शकत नव्हते. माझ्या यजमानांनी मला हळूहळू घरी येण्यास मदत केली. मी बिछान्यावर पडले. मला पूर्वी असे कधी वाटले नव्हते. मला काय होतंय हे कळतच नव्हते. जेव्हा मी बिछान्यावर पडले, मी ख्रिस्ताबद्दल विचार करू लागले. मला

लगेच वाटले कि माझी मुलगी मंदिरात असेल. मी माझा छोटा भ्रमणध्वनी घेऊन एक संदेश पाठवला आणि तिला माझ्या तर्फे 'हेलो' म्हणायला सांगितले व त्याला सांगायचे कि मला अशक्त वाटते.

माझ्या मुलीने मला पुन्हा फोन केला आणि आम्ही दोघींनी देवाने मला बरे करावे म्हणून प्रार्थना केली. येशु क्रुसावर आपल्यासाठी मरण पावला आणि त्यांनी आपली पापे व आजार दूर केले. जेव्हा आम्ही देवाची प्रार्थना केली , आम्ही त्याच्या अभिवचनाचा दावा केला कि मी ख्रिस्ताला मारलेल्या फटक्यांनी बरी केली गेलेली आहे. मी मनात कल्पना केली कि देवाने मला बरे केले आहे. थोड्या वेळाने मला जाणवले कि मला बलवान आणि सर्वसामान्य वाटत होते.

मी परमेश्वराची स्तुती त्याच्या सर्व अभिवचनासाठी करते  कारण ती सर्व खरी आहेत, देवा आभारी आहे कि मला तुम्ही बरे केलेस.

**स्त्रोत्र १०३:१-५**

*"हे माझ्या जीव परमेश्वराला धन्यवाद कर. हे माझ्या सर्व अंतर्यामी. त्याच्या पवित्र नामाचा धन्यवाद कर.*
*हे माझ्या जीव परमेश्वराला धन्यवाद कर*
*त्याचे सर्व उपकार विसरू नको,*
*तो तुझ्या एकंदर दुष्कार्मांना क्षमा करतो.*
*तो तुझा जीव विनाशगर्तेतून उद्धरितो,*
*तो तुला दया व करुन यांचा मुकुट घालतो*
*तो तुझे आयुष्य उत्तम पदार्थांनी तृप्त करतो*
*म्हणून तुझे तारुण्य गरुडासारखे नवे होते."*

**यशया ५३:५**

*खरे पहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला. आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला. आम्हास शांती देणारी अशी शिक्षा त्यास झाली, त्यास बसलेल्या फात्कायांनी आम्हास आरोग्य प्राप्त झाले.*

**अमिलीयाची रोग बरे करण्याची गोष्ट- प्रार्थने मधली चिकाटी**

अमिलीयाला छोटी मुलगी असताना वारंवार कानाचा संसर्गजन्य रोग होत असे. त्याचा परिणाम असा झाला कि कानाच्या तज्ञांना नळ्यांचे तीन संच तिच्या कानात घालावे लागले.नळ्यांच्या शेवटच्या संचामुळे एका कर्णपटलात एक छिद्र राहिले. कर्णतज्ञांनी सुचविले कि शस्त्रक्रियेनि ते बंद करता येईल. अमिलीयाच्या पालकांनी विश्वासाने प्रार्थना केली कि देव तिचा कान बरा करेल. काही वर्षांनी तो संसर्ग थांबला अमिलीयाला तिच्या कानात विचित्र आवाज येत होता. अमिलीयाच्या पालकांनी प्रार्थना केली आणि त्याने दर्शवून दिले कि तो अमिलीयाचा कान बरा करीत होता.

बालरोग चिकित्सकाला दुसऱ्या ठरविलेल्या भेटीसाठी गेल्यानंतर अमिलीयाच्या पालकांना वाटले कि डॉक्टर जाहीर करतील कि तिचा कान बरा झालाय पण त्यांना आश्चर्य वाटले कि डॉक्टरांनी सांगितले कि छिद्रे पडण्याचे थांबले नव्हते.

काय होत होते? तिचे पालक चिकाटीने प्रार्थना करत होते व कान बरे होण्यासाठी मागत होते परंतु बालरोग तज्ञ पुन्हा पुन्हा वार्षिक तपासणीच्या वेळेस तेच निदान करीत होता.

चार वर्षानंतर त्यांना पुन्हा वेगळ्या कारणासाठी तज्ञाला भेटावे लागले. त्यांनी अमिलीयाचा कान तपासला आणि सांगितले कि छिद्र पडण्याचे बरे झाले आहे.

आपण अनेकदा पाहतो कि देवाची आश्वासने लगेच प्रकट होतात. तरीही काही वेळेस देवाला हवे असते कि सतत प्रार्थना करावी. आपले कर्तव्य आहे कि त्याच्या अभिवचनांवर पूर्ण विश्वास ठेवावा कि आपला देव विश्वासू आहे, तो आपली वचने पूर्ण करतो.

**<u>थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:१६-१८</u>**

*सर्वदा आनंदित असा, निरंतर प्रार्थना करा. सर्व स्थितीत उपकार स्मरण करा. कारण तुम्हाविषयी ख्रिस्त येशु मध्ये देवाची इच्छा हीच आहे.*

**<u>स्त्रोत्र संहिता ३०:२</u>**

*हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझा धाव केला आणि तू मला रोगमुक्त केले.*

**<u>लूक १७:१९</u>**

*"तेव्हा त्याने त्याला म्हटले, उठून जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे."*

**सरस्वतीची गोष्ट**

**आपल्याला जरी आपल्या गरजा समजत नसल्या तरी आपल्या देवाला आपल्या गरजा ठाऊक आहेत.**

**<u>स्त्रोत्र ४२:१</u>**

*हरिणी जशी पाण्याच्या प्रवाहासाठी लुलपते तसा हे देवा, माझा जीव तुझ्यासाठी लुलपत आहे.*

मला ख्रीस्ताबरोबर एक वैयक्तिक अनुभव आला आहे. जेव्हा त्याने मला आजारातून बरे केले तेव्हापासून मी अध्यात्मिक रित्या तहानलेली होते व देवाचे प्रेम आणि व त्याचे मार्ग याबद्दल जास्त जाणून घेण्यासाठी भुकेली होते.मनात खोलवर इच्छा होती कि मला एक समुपदेशक हवा. जो मला मार्गदर्शन करेल व अध्यात्मिक बाबी शिकवेल. मी परमेश्वराची प्रार्थना केली. मी मोठ्या आशेने पाहत होते कि मला मार्गदर्शन मिळेल. मी प्रार्थना करत राहिले कि मला एक समुपदेशक मिळावा, ज्याच्या बरोबर मी बोलू शकेन चर्चा करू शकेन. देवाची एकत्र भक्ती करू शकेन आणि त्याच्या नावाचा सदैव गौरव करेन. मधल्या काल मी शास्त्राभ्यासात प्रार्थना करत आणि देवाच्या सान्निध्यात वेळ घालवू लागले. दे मला वेगवेगळ्या मार्गांनी आशीर्वादित करू लागला. काही वेळानंतर मी सल्लागारासाठी प्रार्थना करण्याचे थांबविले. इतर प्राधान्य असलेल्या गोष्टींकडे माझे लक्ष वेधले गेले आणि मी इतर उद्देशांसाठी प्रार्थना करण्यास सुरुवात केली.

दोन वर्षे गेली. मी एका नेतृत्वाच्या परिषदेला उपस्थित राहिले होते. माझी एका शिक्षकाशी भेट झाली.

मला वाटले पवित्र आत्म्याने मला तेलाचा अभिषेक केला आणि मी तिच्या बरोबर बोलावे असे वाटले. माझे तिच्या बरोबर भक्कम नाते निर्माण झाल्यासारखे वाटले. ते कोणते हे मी समजू शकले नाही. मला पवित्र आत्मा मार्गदर्शन करीत होता. कि मी जाऊन तिच्याशी बोलावे पण मी तसे केले नाही.

तिची सभा सुरु झाली व तिने वर्गात काय शिकविले ते मी लक्ष देऊन ऐकले. तिने शिकविले आपण देवाच्या तैनातीस कसे हजर राहावे, कसे त्याच्या अधिक जवळ यावे व त्याची इच्छा जाणून घ्यावी. थोड्या दिवसांनी तिचे वर्ग संपले. ती घटनास्थळ सोडून जाणार होती. मला पवित्र आत्म्याकडून भाषणाचा पुढील भाग सांगितला जात होता कि मी तिच्याशी बोलावे पण तरीही मी अडखळत होते. मी तिच्याबरोबर गाडीपर्यंत गेले व ती गेली. मला वाटले हि भावना काही दिवसांनी जाईल पण ती गेली नाही.

मी परमेश्वराची प्रार्थना केली. दोन दिवसानंतर मी तिला संगणकावरून संदेश पाठवला व तिने उत्तर पाठविले. मला वाटलं ती माझी सल्लागार बनू शकेल. मी तिला माझी सल्लागार बन असे कसे सांगू शकेन? ती मला जास्त ओळखत नव्हती. तिच्याकडे माझ्यासाठी वेळ असेल का? मी खूप प्रार्थना केली आणि तिला विचारले ती माझी सल्लागार होईल का आणि ती माझ्यामध्ये आपला वेळ गुंतवेल का? ती ते करायला तयार झाली.

मी परमेश्वराची स्तुती केली, तो खरंच प्रेमळ पिता आहे. त्याने माझी प्रार्थना ऐकली. काही काळानंतर मी त्या हेतूसाठी प्रार्थना करायचे विसरून गेले. परंतु परमेश्वराला माझी प्रार्थनेची विनंती लक्षात होती व त्याने माझ्या प्रार्थनेला उत्तर दिले. तो खरोखर विश्वासू आहे.

मला एक सल्लागार हवा होता पण परमेश्वराने मला अधिक ज्यादा आशीर्वादित केले. एक प्रेमळ मोठी बहिण, एक शिक्षक (मला एक मोठा भाऊ होता पण मोठी बहिण नव्हती) जी माझी शक्य असलेल्या चांगल्या मार्गांनी काळजी घेत होती. परमेश्वराने खात्री करून घेतली होती कि त्याने ज्या व्यक्तीला मला समजून देण्यासाठी योजले होते ती मला व माझ्या पार्श्वभूमीला समजून घेईल माझे काम आणि मला एक व्यक्ती म्हणून समजून घेईल व मला माझ्या आयुष्यातले अनेक दृष्टीकोन आणि त्याची (देवाची) मोहकता व त्याचे आशीर्वाद यामध्ये ते असेल. मी परमेश्वराचे आभार मानले त्याच्या आशीर्वादासाठी कारण त्याने मला एक छान प्रेमळ मोठी बहिण दिली होती.

परमेश्वर आश्चर्यकारक रीतीने काम करीत असतो. मी काही मुद्द्यावर माझ्या सल्लागाराबरोबर (मोठी बहिण) चर्चा करीत आसे आणि तिच्याकडून नवीन गोष्टी शिकत असे. परमेश्वराने मला त्याचे साधन म्हणून इतरांना मदत करण्यासाठी वापरायला सुरुवात केली. हे देवा तुझे आभार मानते. तुझे प्रेम व विश्वास थोर आहे. मी माझ्या विश्वासाचा प्रवास जो आपल्या विश्वासू देवाबरोबर सुरु केला आहे. तसेच सोबतीला माझी मोठी बहिण (माझी दीदी) आहे त्या प्रवासाचा आनंद घेत आहे.

**<u>नितीसुत्रे ३:५-६</u>**

*तू अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव,*
*आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस*
*तू आपल्या सर्व मार्गात त्याचा आदर कर*
*म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल.*

**<u>मत्तय ७:७-११</u>**

*मग म्हणजे तुम्हास दिले जाईल, शोध म्हणजे तुम्हास सापडेल, ठोका म्हणजे तुम्हास उघडले जाईल.कारण जो कोणी मागतो त्याला मिळते जो शोधतो त्याला सापडते व जो ठोकितो त्याला उघडते. आपल्या पुत्राने भाकर मागितली तर त्याला धोंडा देईल आणि मासा मागितला तर साप देईल असा तुम्हामध्ये कोणी मनुष्य आहे का? यास्तव तुम्ही वाईट असता आपल्या मुलास चांगल्या देणग्या देण्याचे समजता तर तुमच्या स्वर्गातील पित्याजवळ जे मागतात त्यास तो किती विशेषकरून चांगल्या देणग्या देईल.*

## परामिताची गोष्ट- आपला देव आपला तारणारा आहे.
## (स्त्रोत्र ९१ ची शक्ती)

मी एका सभेमध्ये होते तेवा मला माझ्या संगणकावर एक आर्त संदेश माझ्या मोठ्या बहिणीचा आला होता. संभाषण करण्याच्या जागी तिने मला तिचा फोन आला तर मी तो घ्यावा व तिचे ऐकावं कारण माझ्या आईला अपघात झाला होता, तिला तत्काळ दवाखान्यात नेले होते. मी सभेच्या सभागृहाबाहेर गेले व सज्जा मध्ये आले व बहिणीला फोन केला. माझ्या काकांनी माझ्या बहिणीला फोन केला आणि कळविल कि माझ्या आईच्या डोक्यावर नारळ पडला होता व तिला दवाखान्यात घेऊन गेले होते. माझी आई शहरातल्या आमच्या घरात पण गावाच्या भागात राहत होती आणि मी, माझी बहिण आणि माझा भाऊ बंगलोरमध्ये आमच्या गावापासून खूप दूर होतो. काही क्षण मी तणावाखाली होते. मी माझ्या काकांना फोने लावत होते पण तो पोचू शकत नव्हता.मी माझ्या काकीला फोन केला आणि तिच्याशी बोलले. तिच्याकडे माझ्यासाठी जास्त माहिती नव्हती. ती माझ्या घरी जाण्याच्या तयारीत होती. ती घरी गेल्यावर फोन करेल असे मला सांगितले. मी खूप अस्वस्थ आणि बेचैन होते. कोण मला सध्याची परिस्थिती सांगेल? माझी आई कोठे होती व या क्षणाला ती कशी होती? मी माझ्या दुसऱ्या

काकांना फोन करण्याचा प्रयत्न केला.मी क्षणभर थांबले. मी काय करत होते. ज्या व्यक्तीकडे सर्व उत्तरे आणि आश्वासने आहेत त्याच्याशी मी का नाही संपर्क साधत.मी येशूची प्रार्थना केली.

प्रत्येक सकाळी जेव्हा मी उठते व प्रत्येक रात्री मी बिछान्यावर पडते मी स्त्रोत्र ९१ पाठ म्हणते. मी देवाच्या आश्वासनांचे प्रतिपादन करते. जी आश्वासने माझे व माझ्या प्रियजनांचे संरक्षण करणारी आहेत. मी ऑफिसच्या सज्जत उभी होते. मी ९१वे स्त्रोत्र म्हटले. मी देवाची आश्वासने माझ्या आईसाठी मागितली. मी माझ्या आईला देवाच्या स्वाधीन केले आणि त्याला म्हटले मी त्याच्या आश्वासनांवर विश्वास ठेवते. मला स्वतःमध्ये शांतीची जाणीव झाली. तिथे ख्रिस्ताची शांती होती. मी त्या शांतीने आश्चर्यचकित झाले होते. माझ्या आईला दवाखान्यात नेत होते. मला अशी शांती कशी मिळू शकते? आश्चर्य आहे कि ख्रिस्ताची शांती मनुष्याच्या आकलन शक्तीपेक्षा खूप जास्त असते. मी माझ्या बहिणीला फोन केला आणि खात्रीपूर्वक सांगितले कि आपली आई सुरक्षित असेल. मी तिला सांगितले कि येशु जबाबदार आहे. मी परत माझ्या सभेला गेले.

सभा संपल्यानंतर मी माझ्या काकांना फोन केला- ज्यांनी माझ्या आईला दवाखान्यात नेले होते. मी आधी त्यांच्याशी व मग माझ्या आईशी बोलले. माझ्या आईचा आवाज आत्मविश्वासाचा होता. ती म्हणाली ती चांगली आहे. पण थोडी थरथर कापत होती.डॉक्टरांनी सांगितले कि तिचे बारकाईने निरीक्षण करणे जरुरीचे होते. व त्याचा अहवाल संध्याकाळी मिळणार होता.

संध्याकाळी मी निरीक्षणाचा अहवाल कळण्यासाठी फोन केला. देवाची स्तुती, ख्रिस्ताची स्तुती असो. जखमेची एकही खूण नव्हती. नारळ माझ्या आईच्या डोक्यावर पडला होता पण एकही जखम नव्हती. त्या रात्री आईला फक्त एकच वेदनाशामक गोळी घ्यायची होती. कारण एका बाजूला एक छोटेसे टेंगुळ आले होते. दुसरी कोणतीही औषधे नव्हती.

नंतर माझ्या आईने इतरांना सांगितले कि जेव्हा तिला दवाखान्यात घेऊन जात होते ती फक्त ख्रिस्ताचा धावा करीत होती. व त्याला तिची काळजी घेण्यास सांगत होती. माझ्या आईच्या लक्षात आले कि तिच्या डोक्यावर नारळ पडल्याच्या प्रसंगानंतर तिला आधी असलेला पाठीच्या कण्याचा त्रास नाहीसा झाला. हे कदाचित नारळाच्या आघातामुळे असेल. जणू रूप बदलेला दुसरा आशीर्वाद. देवाची स्तुती असो.

स्त्रोत्र ९१ एक शक्तिशाली आश्वासन आपल्या देवाचे आपल्यासाठी असलेल्या संरक्षणा सारखे आहे. मी रोज सकाळी व रोज रात्री स्त्रोत्र ९१ वे म्हणते. दुसरी अनेक माणसे आहेत जी देवाच्या संरक्षणाची साक्ष ९१ वे स्त्रोत्र सांगून देऊ शकतील. मी प्रार्थना करते कि ९१ व्या स्त्रोत्राचे सामर्थ्य व आश्वासन हे जगाच्या कानाकोपऱ्यात सर्व राष्ट्रे व लोकांपर्यंत पोचेल.

**<u>स्त्रोत्र ९१:९</u>**

*कारण परमेश्वर माझा आश्रय आहे असे म्हणून*
*तू परत्पराला निजधाम केले आहे*
*यास्तव कोणतेही अरिष्ट तुजवर येणार नाही*
*कोणतीही व्याधी तुजवर येणार नाही*
*कारण तुझ्या सर्व मार्गात तुझे रक्षण करण्याची*
*तुजविषयी तो आपल्या दिव्यदुतास आज्ञा देईल*
*तुझ्या पायाला धोंड्याची ठेच लागू नये*
*म्हणून ते तुला आपल्या हातात झेलून धरतील*
*तू सिंह व नाग यावर पाय देऊन चालशील*
*तरुण सिंह व अजगर यांस तुडवीत चालशील*

**<u>स्त्रोत्र ९१:१५-१६</u>**

*तो माझा धावा करेल आणि मी त्याचे ऐकेन*
*संकट समयी मी त्याची जवळ असेन*
*मी त्याला मुक्त करेन, मी त्याचा गौरव करेन*

*त्याला दीर्घायुष्य देऊन तृप्त करेन*
*त्याला मी सिद्ध केलेल्या तारणाचा अनुभव घडविन*

**अमितेषची गोष्ट- देवाच्या समंजसपणावर विश्वास ठेवणे**

माझे एमबीए संपल्या नंतर मी बंगलोरमध्ये नोकरी शोधायचे ठरविले. मी बंगलोरला पोचले आणि नोकरीचा तपास सुरु केला. मी अनेक कंपन्यांमध्ये अर्ज पाठवले. बरेच आठवडे खूप प्रयत्न केले पण कुठूनच काहीही उत्तर आले नाही. मी निराश झाले होते. कोलमडून गेले होते. राहून राहून मला घरची खूप आठवण येत होती. मी माझ्या आईबरोबर बोलले. तिला सुद्धा माझी खूप आठवण येत होती. तिने मला सांगितले कि थोडे दिवस मी नोकरीचा शोध थांबवावा आणि घरी यावे. मी माझे विमानाचे तिकीट काढले, माझं सामान भरलं आणि घरी जाण्याची तयारी केली. त्यावेळी मी माझ्या मैत्रिणीच्या घरी राहत होते. मी माझ्या मैत्रिणीच्या घरातून बाहेर पडत होते आणि मला एका कंपनीतून फोन आला. त्यांनी मला दुसऱ्या दिवशी मुलाखतीसाठी बोलावले होते.

मी त्यांना समजावले कि मी काही दिवसांसाठी घरी जात आहे. त्यांना विनंती केली कि परत आल्यानंतर त्यांना भेटले तर चालेल का? मला सांगितले गेले कि ते दुसऱ्या दिवशी मुलाखती घेणार होते आणि निवडीनंतर मला लगेच कामावर रुजू व्हायचे आहे. ते असेही म्हणाले कि मी त्यांना दुसऱ्या दिवशी भेटले नाही तर हि संधी मी गमावून बसेन.

मला निर्णय घ्यायचा होता कि मी घरी जायचे कि माझी घरी जाण्याची सहल रद्द करायची व नोकरीच्या मुलाखतीला हजर व्हायचे.

हि नोकरी एका कॉल सेंटर ची होती व तेथे रात्रपाळी मध्ये काम करावे लागणार होते.  मी नोकरी साठी बरेच दिवस नोकरीच्या शोधत होते आणि मला कामास सुरुवात करून पैसे मिळवायला हवे होते. जर मी घरी जाणे रहित केला तर मी माझ्या पालकांना भेटू शकणार नाही. मला माहित होतं कि माझ्या आईला माझी खूप आठवण येत होती. मला कळेना मी काय करावे? एका बाजूला माझं व्यवसाय होता व दुसऱ्या बाजूला माझ्या पालकांना खूप दिवसानंतर भेटणे. ते मला भेटायला खूप उत्स्तुक होते व त्यांना मनापासून वाटत होते कि मला चांगली नोकरी मिळावी व मी स्थिर व्हावे. मला समजत नव्हते कि मी काय करावे. मी माझ्या मोठ्या बहिणीला फोन केला व तिला परिस्थिती समजून सांगितली. तिने मला मी कोठे आहे हे विचारले. मी तिला सांगितले कि मी माझ्या मैत्रिणीच्या दारात आहे व गावाला जाण्याच्या तयारीत आहे. माझा एक जोडा माझ्या पायात होतां, दुसरा माझ्या एका हातात आणि दुसऱ्या हातात फोन धरून मी तिच्याशी बोलत होते. मला कळेनासे झाले कि मी माघारी फिरायचे कि दुसरा जोडा घालून बाहेर पडायचे.

माझ्या बहिणीने काही आश्वासने वाचून दाखविली आणि प्रार्थना कशी करायची हे शिकविले.

**<u>नितीसुत्रे ३:५-६</u>**

*तू अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव*
*आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस*
*तू आपल्या सर्व मार्गात त्याचा आदर कर*
*म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल*

तिने मला एकांतात जागा शोधून शास्त्र वाचून येशूची प्रार्थना करण्यास सांगितले.(नितीसुत्रे ३:५-६). तिने मला माझी सर्व परिस्थिती येशूच्या स्वाधीन करून त्याने मला मार्गदर्शन करावे असे सांगावे. मी खाली बसले माझे डोळे बंद केले. शास्त्रातील जी वचने तिने मला दिली ती वापरून देवाची प्रार्थना करू लागले. मी देवाला सांगितले कि मी त्याच्या समंजसपणावर विश्वास ठेवते. मी माझी सर्व परिस्थिती त्याची स्वाधीन करून मला मार्गदर्शन करायला सांगितले. एक सौम्य कोमल आवाज माझ्याशी बोलला, "घरी जा". अचानक मला शांतीची जाणीव झाली.

मी घरी जाण्याचे ठरविले. खूप लोकांना वाटले असेल कि नोकरी मिळविणे माझे प्राधान्य असायला हवे होते आणि मी चुकीचा निर्णय घेत आहे. मला मनःशांती मिळाली होती कि मी देवाची आज्ञा पळत आहे. मी घरी गेले. माझ्या पालकांबरोबर आणि मैत्रिणींबरोबर वेळ घालवला. लगेचच मला तीन वेगवेगळ्या कंपन्यांमधून नोकरीचे प्रस्ताव आले होते. माझ्या समोर अनेक प्रस्ताव होते आणि मला कळेना मी कोणती नोकरी निवडायची. मी खूप खुश होते. मला माहित नव्हते कि या नोकऱ्यांच्या प्रस्तावा पेक्षाही चांगली नोकरी माझ्या मार्गात होती.

एका चांगल्या सरकारी संघटनेमध्ये व्यवस्थापकाच्या जागेसाठी, चांगल्या पगाराच्या नोकरीचा प्रस्ताव मला मिळाला. मी आनंदाने चकित झाले कि ते लोक मला एवढ्या मोठ्या पगाराची नोकरी देत होते. कारण हि माझी पहिली नोकरी होती. मला देऊ केलेला पगार बंगलोरमधल्या कॉल सेंटर मध्ये रात्रपाळीच्या कामापेक्षा चार पट अधिक होतां. मी इथे अशी होते. चांगल्या कंपनीत, चांगल्या हुद्द्यावर, चांगला पगार, एका सुंदर नैसर्गिक ठिकाणी माझी नियुक्ती झाली होती. येशूने मला चांगली नोकरी देऊ केली होती. खरंच, मी परमेश्वराचे हवे तेवढे पुरेसे आभार मानू शकत नाही.

**<u>स्त्रोत्र ६६:१९-२०</u>**

*पण देवाने ऐकलेच आहे.*
*माझ्या प्रार्थनेच्या वाणीकडे त्याने लक्ष दिलेले आहे.*
*देवाचा धन्यवाद होवो*
*त्याने माझी प्रार्थना अवमानली नाही.*
*आपली मजवरची दया त्याने काढून घेतली नाही.*

**सुब्राताची गोष्ट - परमेश्वर माझा आश्रय माझा दुर्ग आहे.**

*मी परमेश्वराला म्हणतो' तू माझं आश्रय व माझं दुर्ग आहेस. तू माझं देव तुजवर मी भाव ठेवितो.* (स्त्रोत्र ९१:२)

हल्लीच माझ्या घराचे काम पूर्ण झाले होते. व मला तळमजला भाड्याने द्यायचा होतां. मला पैशाची गरज होती व ती मला घर भाड्यातून मिळाली असती. माझ्या मुलाची प्रकृती ठीक नव्हती व त्याला वर्षातून दोनदा बंगलोरला न्यावे लागे. तळमजल्याच्या घर भाड्यातून मिळणारी रक्कम सहज उपयोगी ठरली असती. ती जागा भाड्यावर घेण्यास तयार असलेली व्यक्ती मिळेना. मी चिंतेत होतो.

माझी पत्नी नुकतीच पाच दिवसांच्या अध्यात्मिक सभांसाठी जाउन आली होती व तिने सभेतील तिचे अनुभव सांगितले. परमेश्वराने तिला व तिच्या सहकाऱ्यांना कसा स्पर्श केला होता, लोक देवाची प्रार्थना कशी करतात, देवाची स्तुती कशी करतात व त्याची भक्ती कशी करतात याबद्दल तिने सांगितले. मला उत्तेजन मिळाल्यासारखे वाटले. मी ठरविले मी परमेश्वराकडे प्रार्थना करणार त्याच्या कडे आमच्या मालमत्तेसाठी भाडेकरू मिळण्यास मदत करावी हे मागणे मागणार.

माझ्या मेहुणीने शास्त्रात लिहिल्याप्रमाणे देवाच्या आश्वासनाच्या शक्तीबद्दल सांगितले होते. आणि आपण विश्वासाने देवाची प्रार्थना कशी करावी हेही सांगितले होते. मी मनापासून येशूची प्रार्थना करू लागलो. रोज ९१वे स्त्रोत्र म्हणू लागलो. थोड्याच दिवसात माझ्या अपेक्षेप्रमाणे भाडे देण्यास तयार असलेला भाडेकरू मला मिळाला. मी निश्चित नव्हतो कि हा भाडेकरू चांगला असेल कि नाही किंवा मी दुसऱ्यासाठी थांबावे का? मग मी सर्व परिस्थिती परमेश्वराच्या हातात सोपविली. परमेश्वर आपल्याला सर्व देतो आणि आम्ही आपले सर्वस्व व परिस्थिती त्याला अर्पण करतो. तो सर्व गोष्टींची काळजी घेतो.

परमेश्वराने सर्व गोष्टींची काळजी घेतली तो खूप विश्वासपूर्ण आहे मला चांगला भाडेकरू मिळाला. भाडे चांगले आहे. जड मिळकतीमुळे मी माझ्या मुलाचा वैद्यकीय खर्च सहज करू शकतो. माझा आर्थिक प्रश्न सोडविला गेला होतां. माझा मुलगा आजारातून बरा होत होतां. मी परमेश्वराची स्तुती करतो. तो प्रेमळ आहे. नक्कीच आपण सर्व त्याचा पुत्र येशु ख्रीस्ताकडून त्याची मुले आहोत.

**<u>स्त्रोत्र ९१:१४-१५</u>**

*त्याचे प्रेम मजवर आहे*
*म्हणून मी त्याला मुक्त करेन*
*त्याला माझ्या नावाची जाणीव आहे.*
*म्हणून मी त्याला उच्च स्थळी निर्भय ठेवीन*
*तो माझा धावा करेल व मी त्याचे ऐकेन*
*संकट समयी मी त्याच्या जवळ असेन*
*मी त्याला मुक्त करेन, मी त्याचा गौरव करेन*